# आरोग्य सेवा संचालनालय

## (महाराष्ट्र शासन)



| | | |
|---|---|---|
| कार्यालय दुरध्वनी क्रमांक : | २२६२१०३१-३४ | आरोग्य भवन |
| संचालक (वैयक्तिक) | २२६२१००६ | ६ वा मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, |
| सहसंचालक (") (रु.राज्यस्तर) | २२६११४७१ | पी. डिमेलो रोड, मुंबई ४०० ००१ |
| उपसंचालक (रुग्णालये) : | २२६५३४६० | महाराष्ट्र राज्य (भारत) |
| सहा.संचालक (") : / फॅक्स : | २२७०३८६१ | ई-मेल jtdirectormed@gmail.com |
| सहा.संचालक (") (रुग्णालये) | २२६७१०४४ | |



क्र.संआसे/मोफत प्लॅा.सर्जरी शिबीरे/कक्ष-८ब/०९
दिनांक:- १५/०९/०९

प्रति,

जिल्हा शल्य चिकित्सक,
जिल्हा रुग्णालये,
अहमदनगर / सोलापूर / लातूर / उस्मानाबाद / चंद्रपूर / यवतमाळ / नागपूर / नांदेड / परभणी / बुलढाणा / औरंगाबाद / जालना / नाशिक / पुणे / जळगांव / सातारा / कोल्हापूर / सिंधुदूर्ग / ठाणे / रत्नागिरी / रायगड / बीड.

विषय: विनामुल्य प्लॅस्टीक सर्जरी शिबीरांस शासनाचे सहकार्य मिळणेबाबत.
संदर्भ: श्री.शांतीलाल मुथ्था, अध्यक्ष, भारतीय जैन संघटना, पुणे यांचे पत्र क्र.बीजेएस/एचओ, दि.६/८/०९

उपरोक्त विषयाच्या संदर्भानुसार आपणांस कळविण्यांत येते की, भारतीय जैन संघटना, पुणे ही संस्था लायन्स क्लब व अन्य स्वयंसेवी संस्थांच्या वतीने महाराष्ट्रात विश्वविख्यात प्लॅस्टीक सर्जन डॉ.शरदकुमार दिक्षित (अमेरिका) यांच्या लॅस्टीक सर्जरी शिबीरांचे गेल्या अनेक वर्षांपासून आयोजन करीत आहे या शिबीरामध्ये मुख्यत्वे दुभंगलेले ओठ, डोळ्यातील तिरळेपणा व चेहऱ्यावरील डाग-अशा महागडया शस्त्रक्रिया विनामूल्य करण्यांत येतात.

यावर्षी सप्टेंबर,२००९ पासून विनामूल्य प्लॅस्टीक सर्जरी शिबीरे आयोजित करण्यांत आली असून आता दि.२९/९/०९ ते २१/०३/१० पर्यंत आपल्या जिल्हयातील विविध भागांमध्ये आयोजित होणाऱ्या शिबीरांचा कार्यक्रम सोबतच्या तक्त्यात जोडण्यांत आला आहे.

तरी सदर तक्त्यानुसार आपल्या जिल्हयात होणाऱ्या विनामूल्य प्लॅस्टीक सर्जरी शिबीरासाठी आपल्या अधिपत्याखाली शासकीय दवाखाने / ऑपरेशन थेटर्स / डॉक्टर्स / भूलतज्ञ व इतर कर्मचारी वर्गाच्या सेवा उपलब्ध करुन द्याव्यात.

(स्वाक्षरी)
सहसंचालक आरोग्य सेवा,
रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई.

प्रत:- अध्यक्ष, भारतीय जैन संघटना, मुथ्था चेंबर्स-२, लेवल-८, १०६/१-ए, सेनापती बापट रोड, पुणे ४११ ०१६ यांना संदर्भाधीन पत्र दि.६/८/०९ च्या अनुषंगाने माहितीसाठी.